जा.क्र. १३८५/२०१८

धर्मादाय आयुक्त भवन,
३रा मजला, ८३, डॉ. ॲनी बेझंट रोड,
वरळी, मुंबई ४०० ०१८.
दूरध्वनी क्रमांक २४९३५४३४ २४९३५४९०

06 MAR 2018

**परिपत्रक क्र. ५३३ दिनांक ०६/०३/२०१८**

राज्यातील सर्व अधिकाऱ्यांना असे निर्देशित करण्यात येते की, राज्यामध्ये प्रत्येक जाती धर्मांची धार्मिक स्थळे असून काही धार्मिक स्थळांकडे लाखो रुपयांचा निधी बँकांमध्ये शिल्लक आहे तर काही धार्मिक स्थळांकडे कोट्यावधी रुपयांचा निधी शिल्लक आहे.

२. धार्मिक स्थळांकडे असणारा निधी हा सार्वजनिक निधी असून या निधीचा उपयोग सामाजिक कामांसाठी व्हावयास हवा. काही धार्मिक स्थळे ही शैक्षणिक, वैद्यकीय व इतर सामाजिक कामांसाठी आर्थिक मदत करतात. मराठवाडा व विदर्भ या विभागांमध्ये शेतकऱ्यांच्या आत्महत्यांचे प्रमाण लक्षणीय आहे. मुलींच्या लग्नाची चिंता किंवा तिच्या विवाहासाठी लागणारा खर्च हे ही आत्महत्या करण्याबाबतचे एक कारण आहे. या जमा निधीपैकी काही निधीचा उपयोग जर गरीब शेतकऱ्यांच्या मुलींच्या विवाहासाठी अथवा समाजातील गरीब घटकांतील मुलींच्या विवाहासाठी केला तर निश्चितच त्या निधीचा चांगला उपयोग होईल. यामुळे शेतकऱ्यांच्या आत्महत्येचे प्रमाण कमी होण्यास व गरीब घटकांमध्ये आपले कुणीतरी आहे ही भावना निर्माण होण्यास मदत होईल व तो त्या निधीचा खऱ्या अर्थाने सामाजिक उपक्रमास वापर असेल. महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० च्या कलम ९ अन्वये समाजकल्याण अथवा सार्वजनिक हितासाठी या निधीचा वापर करता येऊ शकतो. गरीबांचे सामुहीक विवाह हा ही धर्मादाय उद्देशच आहे.

३. महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० च्या कलम ६९ अन्वये धर्मादाय आयुक्तांना न्यासाचा पालक म्हणून एखाद्या संस्थेच्या अथवा न्यासाच्या निधीचा योग्य वापर करण्यासाठी निर्देश देण्याचे अधिकार आहेत. त्यामुळे आपण आपआपल्या जिल्ह्यातील सर्व धार्मिक स्थळांच्या विश्वस्तांची बैठक बोलवावी. त्यास शैक्षणिक व सामाजिक संस्थेतील विश्वस्तांनाही बोलवावे. आपणास योग्य वाटेल एवढ्या विश्वस्तांची जिल्हास्तरीय समिती गठीत करावी.

या समितीमध्ये प्रत्येक धार्मिक स्थळांचे एक विश्वस्त अथवा आपणास वाटल्यास शैक्षणिक व सामाजिक संस्थांतील विश्वस्तांचाही त्यामध्ये समावेश करता येईल. या समितीच्या सदस्यांची संख्या ठरविण्याचे अधिकार आपणास राहतील. परंतु समितीतील सदस्यांची संख्या मर्यादित असावी. जर विश्वस्तांची संख्या जास्त असेल तर आपण समितीमध्ये योग्य ते विश्वस्त निवडावेत. या समितीची स्थापना झाल्यानंतर या समितीची महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० च्या कलम ४१(क) अन्वये नोंदणी करावी व बँकेमध्ये खाते उघडावे. सर्व धार्मिक स्थळांतील बँकामध्ये ठेवलेल्या निधीचा आपण आढावा घ्यावा. संस्थांकडून जमा झालेला निधी बँकेमध्ये जमा करावा. धार्मिक स्थळांकडे जमा असलेल्या निधीपैकी काही निधी या सामुदायिक विवाहासाठी घ्यावा. याबाबत विश्वस्तांशी चर्चा करुन निर्णय घ्यावा. त्याचबरोबर शैक्षणिक व सामाजिक संस्थांकडूनही त्यांच्या इच्छेप्रमाणे निधी घेता येईल. त्या समितीतील सदस्यांपैकी काही सदस्यांना ते बँक खाते operate करण्याचे अधिकार द्यावेत. हा निधी बँकेतच जमा करावयाचा आहे. त्या नंतर त्या जिल्ह्यातील गरीब शेतकऱ्यांना व गरीब घटकांना आवाहन करुन मुलींच्या विवाहाबाबत नोंदणी करण्याचे आवाहन करावे, समितीकडे अथवा धर्मादाय कार्यालयाकडे त्यांची नावे नोंदवून घ्यावीत व सामुदायिक विवाहाचे आयोजन करावे. सदरील सामुदायिक विवाह हा एकत्रित करावयाचा असून त्या त्या धर्माच्या विधिप्रमाणे करावयाचा आहे. अनावश्यक खर्च टाळावयाचा आहे.

४. राज्यामधील सर्व जिल्ह्यातील धर्मादाय उप आयुक्त अथवा सहायक धर्मादाय आयुक्त यांनी त्या कामकाजावर देखरेख करावी. त्या त्या विभागाच्या धर्मादाय सह आयुक्तांनी या सामुदायिक विवाहाची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यासाठी पुढाकार घ्यावा.

6-3-18.

(शि.ग.डिगे)
धर्मादाय आयुक्त,
महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रत :

१. परिपत्रक धारिणी
२. सर्व धर्मादाय सह आयुक्त
३. सर्व धर्मादाय उप आयुक्त
४. सर्व सहायक धर्मादाय आयुक्त
५. संगणक शाखा, मुख्यालय (प्रत वेबसाईटवर अपलोड करण्यासाठी)